संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# निवडणूक सुधारणांची गरज सांगणारा प्रचार

**यावेळची** लोकसभा निवडणूक मतदारांसाठी मोठाच नवा अनुभव देणारी आहे कारण समाजमाध्यमांचा प्रचंड प्रमाणात झालेला वापर आचारसंहिता असूनही राजकीय पक्षांकडून झालेली पैशांची उधळपट्टी, ईव्हीएम मशीन्सबाबत थेट सर्वोच्च न्यायालयात झालेली तक्रार आतापर्यंतचे सगळे विक्रम मोडून देशभर तब्बल दोन हजार कोटींची सापडलेली रोकड जनतेच्या मूलभूत प्रश्नांना बगल देणारे प्रचारातले आक्रमक मुद्दे, अशा एक ना अनेक मुद्दांबाबत यावेळच्या निवडणुकीने नवीनच पायंडे पाडल्याचे दिसून येते. या सर्वांची एकत्रितपणे गोळाबेरीज केली तर मूलभूत निवडणूक सुधारणा ही काळाची गरज असल्याचे सिध्द होते. सर्वात मोठ्या लोकशाहीवादी देशात हा लोकशाहीचा महोत्सव साजरा होत असताना उत्साहाच्या भरात नियम, कायदे धाब्यावर बसवण्याचे प्रकार सर्रासपणे दिसून येत आहेत. कायदा अस्तित्वात असूनही त्याचा वापर होऊ द्यायचा नाही. किंवा कायदा असूनही जणुकाही त्याचे अस्तित्वच मान्य करायचे नाही. अशा प्रकारची बेमुर्वतखोरी यावेळच्या निवडणूक प्रचारांमधून अगदी उघडपणे दिसून येत आहे. स्थानिक पातळीवरचे उमेदवार आचारसंहितेला आपल्या खिशात घालून फिरताना दिसतातच. परंतु राजकीय पक्षांकडून होणारे रोड शोसुध्दा पैशाचे सवंग प्रदर्शन करणारेही ठरले आहे. वाराणसीतला नरेंद्र मोदींचा रोड शो हे त्याचे अगदी ठळक उदाहरण म्हणावे लागेल. याशिवाय जाहीर सभांमधल्या प्रचाराची पातळी हीसुध्दा यावेळच्या निवडणुकीचे वेगळे वैशिष्ट्य दाखवणारी ठरते. म्हणूनच या निवडणुकीतले हे दोष आणि त्रुटींची खरे तर स्वतंत्रपणे चर्चा व्हायला हवी आणि भविष्यकाळात निवडणुकीतला प्रचार आणि पैशाचा सवंगपणा रोखण्याकरीता तितक्याच वेगाने निवडणूक सुधारणा घडवून आणायला हव्यात. लोकशाहीचे भवितव्य हे मतदारांच्या हाती जरी असले तरी राजकीय पक्ष किंवा राजकारण्यांकडून याच लोकशाहीच्या नावाने जो काही धुमाकूळ चालला आहे त्याला लगाम घालावा लागेल. या सगळ्या गोष्टी ज्या संविधानाने लोकशाहीची ग्वाही दिलेली आहे त्या सन्मान ठेवण्यासाठी तितक्याच महत्वपूर्ण ठरतात. जर सत्ता, पैसा, अधिकार, सरकारी यंत्रणा याच्या जोरावर कोणताच राजकीय पक्ष काहीच ऐकण्याच्या मनस्थितीत नसेल तर त्यांना त्याची जाणीव करून देण्याची जबाबदारी समाजातल्या विचारवंतांनी किंवा त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांनी बजावली पाहिजे.

### पुन्हा शेषन युग हवे

प्रत्येक लोकसभा निवडणुकीने काही ना काही त्रुटी नेहमीच दाखवल्या. जवळपास १९७७ पर्यंत बोगस मतदान किंवा मतपेट्या पळवण्याचे प्रकार सर्रासपणे होत असत. त्याला आळा घालण्याचा प्रयत्न वारंवार होत राहिला. सुरक्षा व्यवस्था अधिकाधिक मजबूत करण्याचा प्रयत्न झाला. ८४ नंतर निवडणुका म्हणजे राजकीय पक्षांची दंडेली असेच स्वरूप प्राप्त झाले होते. निवडणुकांच्या काळात पैशाचा अक्षरशः महापूर पाहायला मिळत असे. प्रचारासाठी नव्या कोऱ्या करकरीत वाहनांचा ताफा गावोगावी रवाना केला जात असे. ग्रामीण भागात आदिवासी भागात अगदी उघडपणाने पैशांचा वापर होत असे. दुसऱ्याच्या नावावर कोणीही मतदान करून येत असे काही राजकीय पक्ष तर आपल्या कार्यालयात मतदारांची यादी घेऊन बसत असत. आणि ज्या मतदारांनी मतदान केलेले नाही त्यांच्या नावावर ते डमी मतदार मतदान करून येत असत. त्यावेळेला बोटावर लावली जाणारी शाईसुध्दा सराईतपणे पुसली जात असे. बोगस मतदानाचा हा गोरख धंदा अगदी ९० पर्यंत विशेषत्वाने दिसून आला. दरम्यानच्या काळात मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून टी.एन. शेषन यांची नियुक्ती झाली आणि त्यांनी निवडणूक सुधारणांमधला एक इतिहासच घडवून आणला. मतदाराला ओळखपत्र देण्यापासून ते निवडणुकीतल्या अंदाधुंद खर्चावर आणि कर्णकर्कश प्रकारावर कडक निर्बंध आणणारी आचारसंहिताही लागू केली. निवडणूक काळामध्ये जवळपास सगळा देश प्रचाराच्या निमित्ताने अक्षरशः विद्रूप केला जात असे. जिकडे तिकडे भिंती रंगवून या शहराचे गावाचे स्वरुपच किळसवाणे केले जात असे मनाला वाटेल तिथे फलक लावणे. चौकाचौकात कटआऊटस उभे करून प्रचाराचा अक्षरशः धांगडधिंगा घातला जात होता. म्हणजेच निवडणुकीच्या निमित्ताने सगळा देश वेठीला धरण्याचा जो काही प्रकार व्हायचा त्याला शेषन यांच्या कारकिर्दीत चांगलाच लगाम बसला. आता पुन्हा अशाच शेषन युगाची आवश्यकता आहे असे वाटू लागले.

### निवडणूक बंदीचाही उपाय हवा

निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था असते. आणि निवडणूक आयुक्तांनी अक्षरशः न्यायाधिशांप्रमाणेच निर्भीडपणे वागून लोकशाही मूल्यांचे जतन करावे अशी अपेक्षा असते. दुर्दैवाने शेषन यांच्यानंतर असे धैर्य कोणत्याच निवडणूक आयुक्ताने दाखवलेले नाही. पण त्याहीपेक्षा जे राजकीय पक्ष किंवा नेते देशाच्या भवितव्याच्या वल्गना करीत असतात. त्यांनीसुध्दा लोकशाहीसाठी आवश्यक असलेल्या सभ्यता पाळू नयेत ही त्यातली मोठी शोकांतिका ठरते. निवडून येण्यासाठी किंवा लोकप्रियतेचे प्रदर्शन करण्याकरिता इतक्या विचित्र पध्दतीने राजकीय पक्ष व्यवहार करताना जेव्हा दिसतात त्यावेळी त्यांच्यातला राजकीय स्वार्थ हा लोकशाहीलाच पराभूत करायला लागला आहे की काय असे वाटू लागते. म्हणजे काँग्रेस काळापासून सुरू असलेली पैशांची उधळण करण्याची परंपरा आजही तशीच कायम आहे. आचारसंहितेच्या माध्यमातून राजकारण्यांना सभ्यतेचे धडे घालून देण्याचा प्रयत्न वारंवार केला जातो. पण त्यालाही जुमानले जात नाही. यंदा प्रथमच एका राज्याच्या मुख्यमंत्र्याला आणि एका प्रादेशिक पक्षाच्या प्रमुखाला दोन दिवस प्रचार करण्याची बंदी घालण्याची वेळ आली याचा अर्थ मूलभूत किंवा किमान जाणीव या लोकांकडून ठेवली गेली नाही हे स्पष्ट होते. हे सगळे प्रकार सातत्याने घडताना दिसतात. आणि एकटा निवडणूक आयोग त्याचे नियंत्रण करायला असमर्थ ठरतो. म्हणूनच अधिक कडक स्वरुपाच्या निवडणूक सुधारणा अत्यंत अनिवार्य ठरतात. त्यामध्ये राजकीय पक्षांची मान्यता रद्द करण्यापासून ते उमेदवाराला निवडणूक बंदी करण्यापर्यंतच्या अनेक उपायांचा समावेश केला गेला पाहिजे.